अ.भा.से. (कार्यमुल्यांकन अहवाल) नियम, २००७ अनुसार २०२६-२०२७ वर्षाकरीता भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी करुन घ्यावयाच्या वैद्यकीय तपासणीबाबत- पुरकपत्र.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन पुरकपत्र, क्रमांक : भाप्रसे-१५२४/प्र.क्र.२१६/२०२४/भाप्रसे-३,
मंत्रालय,मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- ०४ नोव्हेंबर, २०२६

वाचा:- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.१५२४/प्र.क्र.२१६/२०२४/भाप्रसे-३, दि.१७.०१.२०२५

प्रस्तावना :-

अखिल भारतीय सेवा (कार्यमूल्यांकन अहवाल) नियम, २००७ मधील तरतूदीनुसार ४० वर्षावरील भा.प्र.से. अधिकाऱ्यांनी त्यांच्या वैद्यकीय तपासण्या विहीत केलेल्या नमून्यात प्रतिवर्षी करुन घेणे आवश्यक असल्यामुळे सन २०२४-२५, २०२५-२६ व २०२६-२७ या तीन वर्षाकरीता महसूल विभागनिहाय निश्चित केलेल्या खाजगी रुग्णालयातून किंवा शासकीय किंवा महानगरपालिका रुग्णालयातून वैद्यकीय तपासणी करण्याकरीता उपरोक्त संदर्भाधीन दि.१७.०१.२०२५ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयासोबत प्रपत्र "अ" व "ब" जोडण्यात आली आहे. प्रपत्र "अ" मध्ये खाजगी रुग्णालयातून किंवा शासकीय किंवा महानगरपालिका यांची यादी आहे. तसेच, प्रपत्र "ब" वैद्यकीय चाचण्यांची यादी दिलेली आहे. मुंबई/कोकण विभागाकरीता एकूण सहा रुग्णालये निश्चित करण्यात आली असून त्यांचे दर, संबंधित अधिकारी व त्यांचा दूरध्वनी क्रमांक प्रपत्र-अ मध्ये नमूद करण्यात आला आहे. मुंबई/कोकण या महसूल विभागाकरीता Wockhardt Hospital, Mumbai Central, Mumbai व Meesha Healthcare & Research Pvt. Ltd., Mumbai या दोन रुग्णालयांची नावे उक्त शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र- अ मध्ये समाविष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे पुरकपत्र निर्गमित करण्यात येत आहे:-

शासन पुरकपत्र:-

अखिल भारतीय सेवा (कार्यमुल्यांकन अहवाल) नियम, २००७ मधील नियम ३ व त्यासोबतचा नमूना ४ अनुसार, दिनांक दि.३१.०३.२०२६ रोजी ४० वर्षे किंवा अधिक वय असलेल्या राज्यातील भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी त्यांची विहित वैद्यकीय तपासणी करुन घेण्याकरिता दि.१७.०१.२०२५ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या रुग्णालयाची यादी प्रपत्र-अ मध्ये नमूद करण्यात आली असून प्रपत्र-अ च्या अ.क्र.०१ मुंबई/कोकण या महसूली विभागामध्ये खाली नमूद रुग्णालयांचा समावेश करण्यात येत आहे.

अ.क्र	रुग्णालयाचे नाव	वैद्यकीय तपासणीचे प्राप्त दर		संपर्क अधिकारी व दुरध्वनी क्रमांक
		पुरुष	महिला	
१.	Wockhardt Hospital, Mumbai Central, Mumbai	रू.१०,४००/-	रू.९३२५/-	आदित्य आर. शिंदे मोब.क्र.९८१९९१८८३२
२	Meesha Healthcare & Research Pvt. Ltd., Mahalami, Bandra and Borivali, Mumbai.	रू.५५००/-	रू.५५००/-	किरण प्रभाकर जोशी मोब.क्र.९८२०७०९८८८

२. शासन निर्णय, क्र.१५२४/प्र.क्र.२१६/२०२४/भाप्रसे-३, दि.१७.०१.२०२५ मधील अन्य तरतुदी कायम राहतील.

सदर शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६११०४१३३९२०७६०७ असा आहे. हे पुरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

ARCHANA JAGDISH TAMORE

Digitally signed by ARCHANA JAGDISH TAMORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=B89CC23BA64C2E257250277AA5FBFDC9F82CB978BC5E229E7598BBA40A61D487, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=61749DEAF7128E9D69EA5D23C7A15EEA58D13AD6EAF0FA0A656E1BBA62A15BD5, cn=ARCHANA JAGDISH TAMORE
Date: 2026.11.04 13:40:30 +05'30'

(अर्चना तामोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
७. महाराष्ट्र संवर्गातील ४० वर्षे वयावरील भारतीय प्रशासन सेवेतील सर्व अधिकारी.
प्रपत्र अ मधील सर्व खाजगी रुग्णालये.
८. सर्व शासकीय, महानगरपालिका रुग्णालयांचे अधिष्ठाता/जिल्हा शल्य चिकित्सक.
९. निवड नस्ती (भाप्रसे-३)